संयुक्त वन व्यवस्थापन समितीचे बळकटीकरण व ग्रामसभेला जोडणे तसेच वनक्षेत्रात असलेल्या गड-किल्ल्यांचे जतन करणे.

**महाराष्ट्र शासन**

महसूल व वन विभाग,

**शासन निर्णय क्रमांक : एफडीएम २०११/प्र.क्र.१००/फ-२**

मंत्रालय.मुंबई-४०० ०३२,

दिनांक :- ५ ऑक्टोबर, २०११

वाचा :- १) महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्र.एमएससी/२०००/प्र.क्र.१४३/फ-२, दि.२५.०४.२००३.

२) महसूल व वन विभाग, शासन शुद्धिपत्रक क्र.एमएससी/२०००/प्र.क्र.१४३/फ-२, दि.२६.०९.२००३.

३) केंद्रिय पर्यावरण व वन विभागाचे पत्र क्र.डी.ओ.नं.१-५० एमओएस(आय/सी)ई ॲण्ड एफ/१०, दि.२९.१०.२०१०

**प्रस्तावना :-**

राष्ट्रीय वननीती, १९८८ अन्वये वनसंरक्षण आणि वनविकासासाठी स्थानिक लोकांचा सहभाग अभिप्रेत आहे. त्यानुषंगाने केंद्र शासनाच्या पर्यावरण आणि वन मंत्रालयाने वेळोवेळी मार्गदर्शक सूचना जारी केलेल्या आहेत. या सूचनांप्रमाणे महाराष्ट्र शासनाने दि. १६ मार्च १९९२ चा शासन निर्णय निर्गमित केला होता. त्यामध्ये दि. २५.०४.२००३ च्या शासन निर्णयान्वये सुधारणा करण्यात आली होती. दिनांक २५.४.२००३ च्या शासन निर्णयामध्ये ग्रामिणांच्या सहभागातून वन व्यवस्थापन या कार्यक्रमांतर्गत ग्रामीण परिसरातील अपगत व अवनत व वनेतर उपयोग या कार्यक्रमासाठी करण्याबाबत तसेच कार्यक्रमांतर्गत वनपडिक जमिनीचा सुध्दा आणि ४० टक्केच्या वन घनता असलेली वने (चांगली वने) यांचा अंतर्भाव करुन संयुक्त वन व्यवस्थापन समिती स्थापन करुन त्यामध्ये सर्वसाधारण समिती व कार्यकारी समितीचा अंतर्भाव केला होता. सदरहू शासन निर्णयामध्ये सर्वसाधारण समिती व कार्यकारी समितीची रचना संयुक्त वन व्यवस्थापन समितीची नोंदणी, संयुक्त वन व्यवस्थापन समितीचे बचत खाते, संयुक्त वन व्यवस्थापन समितीच्या बैठका, कार्यक्रमासाठी क्षेत्राची निवड, क्षेत्र निवडीनंतर कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी समझोता समन्वय (Memorandum of Understanding), सूक्ष्म योजना (Micro Plan), सूक्ष्म योजनांना मान्यता देणाऱ्या समितीचे गठन, संयुक्त वन व्यवस्थापन समितीतील सदस्यांची कर्तव्ये व जबाबदाऱ्या, समिती आणि सदस्यांना मिळणारे फायदे, रोपवन व

अवनत/चांगल्या वनक्षेत्रातील अंतिम व अंतरिम फायदे, चराईवरील नियंत्रण, सदस्यत्वाची बरखास्ती, समितीची मान्यता काढणे, अपील इत्यादी., संयुक्त वन व्यवस्थापन कार्यक्रमाच्या अंमलबजावणीतील निरीक्षण व मार्गदर्शनाकरीता राज्यस्तरीय सुकाणू समिती इत्यादिबाबतचा उहापोह केलेला आहे.

केंद्रीय वन मंत्रालयाने त्यांच्या दि. २९.१०.२०१० च्या पत्रान्वये पंचायत (अनुसूचित क्षेत्रात विस्तारीत) अधिनियम, १९९६ लक्षात घेऊन संयुक्त वन व्यवस्थापन समित्या ग्रामसभेच्या अखत्यारित आणण्याबाबत काही सूचना दिलेल्या असून सदरहू सुचनेच्या अनुषंगाने त्याचप्रमाणे वन हक्क अधिनियम अमलात आल्यामुळे संयुक्त वन व्यवस्थापन समितीच्या कार्यक्रमामध्ये बदल करणे आवश्यक असल्यामुळे संयुक्त वन व्यवस्थापन समितीचे बळकटीकरण व ग्रामसभेला जोडण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती. याशिवाय वन पर्यटन वाढत असले तरी वनक्षेत्रातील किल्ले व निसर्गरम्य ठिकाणांवर कोणाचेही नियंत्रण नसल्यामुळे ना-दुरुस्त झालेले असल्यामुळे व सर्व परिसरामध्ये पर्यटकांकडून कचरा टाकण्यात येत असल्यामुळे त्यांचे रक्षण व संवर्धन होणे आवश्यक आहे. म्हणून वनक्षेत्रावरील बांबूवरील अधिकार आणि जलस्त्रोत, प्रपात, पाणवठे, गड, किल्ले इत्यादी आकर्षक असणाऱ्या पर्यटन स्थळांना भेट देणाऱ्या पर्यटकांवर नियमन या बाबी देखील ग्रामसभा व त्या अंतर्गत स्थापन होणाऱ्या संयुक्त वन व्यवस्थापन समितीकडे देण्याचे देखील विचाराधीन होते.

## शासन निर्णय :-

वरील सर्व बाबी लक्षात घेऊन दि. २५.०४.२००३ च्या शासन निर्णयातील ज्या बाबी या शासन निर्णयान्वये चालू ठेवण्यांत आल्या आहेत अश्या बाबी वगळुन उर्वरित बाबी अधिक्रमित करुन या कार्यक्रमाबाबत खालीलप्रमाणे शासन निर्णय घेण्यात येत आहे.

**१. संयुक्त वन व्यवस्थापन समितीचे उद्दिष्ट्ये, समितीचे गठण, कर्तव्ये व जबाबदाऱ्या, समितीला होणारे फायदे, वनक्षेत्रामधील अंतिम व अंतरिम तोडीचे फायदे, संयुक्त वन व्यवस्थापन समितीची वा समिती सदस्यत्वाची मान्यता रद्द करणे, राज्य पातळीवरील समिती याबाबतचे धोरण**

**१) उद्दिष्ट्ये :-**

- देशाच्या वनांचे शाश्वत संरक्षण, संवर्धन आणि व्यवस्थापन या माध्यमातून गावाचा सर्वांगिण विकास साधणे.
- वनांचे सुयोग्य संरक्षण व व्यवस्थापन करुन त्यांना उत्पादक घटक म्हणून विकसित करणे व त्याकरिता पोषक असे व्यवस्थापन गावसमाजाच्या सहभागातून साध्य करणे.

- वने जास्त असलेल्या भागात वन हाच विकासाचा मुख्य आधार बनेल व त्यातून त्या भागाचा शाश्वत विकास साधेल यासाठी प्रयत्न करणे.
- ग्रामीण आणि आदिवासींची प्रामुख्याने जळण, चारा, लहान इमारती लाकूड, जीवनावश्यक वनोपज व रोजगाराची गरज भागेल असे वन व वनेत्तर जमिनीचे नियोजन त्यांच्या सहभागातून साध्य करणे.
- कार्य आयोजना आणि वानिकी मानक/मापदंड विचारात घेऊन बांबूसह गौण वनउपजाचे व्यवस्थापन, संवर्धन व गावाच्या विकासासाठी त्याचा उपयोग करणे.
- वन पर्यटनस्थळांची माहिती पर्यटकांना देणे. वनसंवर्धन व्यवस्थापन करणे.

२) **कार्यक्रमांतर्गत निवड करावयाचे वनक्षेत्रे.**

ग्रामीण परिसरातील अपगत व अवनत वनक्षेत्र व वनेतर क्षेत्राचा (राष्ट्रीय उद्याने व अभयारण्य सोडून) उपयोग या कार्यक्रमासाठी प्रामुख्याने केला जाईल. सदर कार्यक्रमामध्ये ४० टक्केच्या वर घनता असलेली वने (यापुढे अशा वनांना **"चांगली वने"** असे नमूद करण्यात येईल) सुध्दा घेण्यात येतील .

३) **संयुक्त वन व्यवस्थापन समितीचे गठण**

सदर समिती मुंबई ग्राम पंचायत अधिनियम, १९५८ च्या कलम ४९ अंतर्गत असलेल्या तरतुदीस अनुसरुन राहील या समितीची रचना याच अधिनियमातील कलम ४९ मधील उप कलम १,२,३,४ नुसार राहील व त्यास वन संवर्धन आणि विकासाकरीता संयुक्त वन व्यवस्थापन समिती असे संबोधता येईल. या समितीची निर्मिती ग्रामसभा करील. या समितीचा कालावधी पंचायतीच्या कालावधीशी सुसंगत राहील. या समितीचे अधिकार, कार्यव्याप्ती याबाबत ग्रामसभेने पंचायतीशी सल्लामसलत करुन निश्चित करावयाचा आहे व त्याचप्रमाणे या समितीच्या कामकाजावर पंचायतीच्या नियंत्रणाखाली ग्रामसभेने देखरेख आणि कार्यपध्दतीचे नियमन करणेचे आहे. या समितीमध्ये १२ आणि कमाल २४ अशी सदस्य संख्या असेल. या सदस्यांपैकी १/३ पेक्षा कमी नाही असे सदस्य पंचायतीमधील राहतील आणि निम्याहून कमी महिलांची संख्या नसेल. या व्यतिरिक्त शासनाने निर्देश दिल्यानुसार अनुसूचित जाती, अनुसूचित

जमाती, विमुक्त आणि भटक्या जमाती यांनाही प्रतिनिधीत्व अनिवार्य असेल. महिला सदस्यांची नियुक्ती करताना गाव पातळीवरील महिला ग्राम सभेने केलेली शिफारस विचारात घेणे आवश्यक असेल. अशारितीने स्थापन करण्यात येणाऱ्या संयुक्त वन व्यवस्थापन समितीचा ठराव ग्रामसभा पारित करुन स्थानिक वनक्षेत्रपाल यांना पाठवेल. शासनाचे वतीने संयुक्त वन व्यवस्थापन समितीचे पदसिध्द सदस्य सचिव वनपाल/वनरक्षक हे कार्य करतील. सर्वसाधारणपणे ज्या गावाची लोकसंख्या १००० पेक्षा अधिक असेल तेथे वनपाल सदस्य सचिव राहतील. ज्या संयुक्त वन व्यवस्थापन समितीचे गठण दि. २५.४.२००३ च्या शासन निर्णयाच्या कार्यपध्दतीनुसार करण्यात आले आहे, अशा समितीचा कार्यकाळ समाप्तीनंतर वर उल्लेखित कार्यपध्दतीप्रमाणे नवीन संयुक्त वन व्यवस्थापन समितीचे गठण करण्यात येईल. अशाप्रकारे नवीन संयुक्त वन व्यवस्थापन समितीचे गठण होईपर्यंत पूर्वीची समिती कार्यरत राहील. परंतू, जुन्या समितीस ग्रामसभेची मंजुरी घेणे अनिवार्य राहील. असे केल्यास सुरु असलेली काम विस्कळीत होणार नाहीत.

आदिवासी क्षेत्रामध्ये ग्रुप ग्रामपंचायतीमध्ये वस्ती/ पाडे असतील तर प्रत्येक वस्ती/पाडे यांची स्वतंत्र संयुक्त वन व्यवस्थापन समिती त्यांच्या ग्रामसभेमधून करावी व त्यामध्ये वस्ती/पाडे यामधील लोक सदस्य म्हणून पात्र राहतील.

४) **<u>समितीला द्यावयाच्या वनक्षेत्राची निवड</u>** :-

वनपरिक्षेत्र अधिकारी समितीचे सभासद व कार्यकारी समितीचे यादीसह अहवाल, उपवनसंरक्षक यांचेकडे पाठवतील. उपवनसंरक्षक त्यांचेकडे प्राप्त झालेल्या प्रस्तावांची छाननी करुन संबंधित सहायक वनसंरक्षक, वनपरिक्षेत्र अधिकारी व संयुक्त वन व्यवस्थापन समितीशी सल्लामसलत करुन समितीकरिता वन व वनेतर क्षेत्राची निवड करतील. समितीला द्यावयाच्या क्षेत्राची निवड करताना सभासदांची संख्या, वनाची उत्पादन क्षमता वनक्षेत्रातील पर्यटन स्थळे व तत्सम ठिकाणे इत्यादींचा विचार करुन क्षेत्राची निवड केली जाईल. सर्वसाधारणपणे गावठाणापासून ३ कि.मी. पर्यन्तचे क्षेत्र समितीचे व्यवस्थापनाकरिता निवडण्यात यावे. एकापेक्षा अधिक गावे असल्यास दोन गावांच्या मध्यभागापासून ग्रामस्थांच्या सहकार्याने क्षेत्र अंतिमत: निश्चित केले जाईल.

५) **समझोता समयलेख**

समितीचे क्षेत्र निवडल्यानंतर व नोंदणी केल्यानंतर विहीत प्रपत्रामध्ये उपवनसंरक्षक (प्रा.) व संयुक्त वनव्यवस्थापन समिती यांचेमध्ये समझोता समयलेख करण्यात येईल. तसेच यापूर्वी झालेल्या समझोता समयलेखाचा कार्यकाळ समाप्त झाला असेल तर अशा समितीचे नवीन समझोता समयलेख वरील पध्दतीप्रमाणे करता येईल. **समितीची नोंद झाल्यापासून १ महिन्याचे आत सुधारित समझोता समयलेख तयार करण्यात येईल.** या प्रस्तावानुसार समझोता समयलेख यामध्ये यथानुरुप बदल करण्याबाबत प्रधान मुख्य वनसंरक्षक तथा वनबल प्रमुख यांचे स्तरावर निर्णय घेण्यात येईल.

६) **सूक्ष्म योजना**

वन, वन्यजीव व जैवविविधता यांचा अविभाज्य संबंध असल्याने संयुक्त वनव्यवस्थापन समिती वनविभागाच्या सहभागाने वनाचे संरक्षण, वन्यजीवांचे व जैव विविधतेचे संरक्षण, संवर्धन, मृद व जलसंधारण, गावविकास, रोजगार निर्मिती आणि उत्पन्न वाढीबाबत योजना या सर्व बाबींचा विचार करुन सूक्ष्म योजना तयार करेल. प्रामुख्याने वनक्षेत्रावर अवलंबत्व कमी करणे, सुधारित चुली, बायोगॅस व तत्सम साधनांचा वापर, घरगोठा व त्याच्याशी निगडीत चारा निर्मिती, पर्यटन स्थळांची देखभाल तथा मार्गदर्शक नियुक्ती, बांबू समुपयोजन इत्यादी बाबींचा अंतर्भाव असेल.

वनालगतच्या क्षेत्राजवळील शेतकरी/कास्तकार वंश परंपरेनुसार ढोबळमानाने निश्चित करण्यात आलेल्या वनक्षेत्रातुनच आपल्या दैनंदिन गरजा भागवितो. यास्तव अशा क्षेत्राचे संरक्षण करण्याची जबाबदारी त्याच कास्तकारास संयुक्त वन व्यवस्थापन समितीने दिल्यास चराई/वणवा/चोरटी ताडे/अतिक्रमण यासारखे गुन्हे आटोक्यात आणण्याचे काम प्रभावीपणे होईल. या बाबीवर भर देण्याकरीता अशा कास्तकाराकरीता प्रोत्साहनात्मक योजना राबविण्याचा समावेश सूक्ष्म आराखड्यात असेल.

वरील सूक्ष्म योजनेमध्ये वनाचे व्यवस्थापन, कार्य आयोजनाच्या तत्त्वप्रणालीनुसार असेल. त्यामध्ये वनसंवर्धन अधिनियम, १९८० अंतर्गत तरतुदी व इतर संबंधित कायद्याचे उल्लंघन होणार नाही याची दक्षता घेण्यात येईल. वनक्षेत्रावर समिती सदर योजना समितीशी सल्लामसलत करुन उपवनसंरक्षक (प्रा.) यांचेकडे सादर करेल. सूक्ष्म योजना प्राप्त झाल्यानंतर उपवनसंरक्षक (प्रा.) योजनेची छाननी करुन सूक्ष्म योजनेस मंजुरी देऊन संयुक्त वनव्यवस्थापन समितीस कळवतील. सूक्ष्म

योजना समझोता समयलेख तयार झाल्यानंतर पुढील २ महिन्यात तयार करण्याची जबाबदारी संबंधित उपवनसंरक्षक (प्रा.) यांची राहील.

संयुक्त वन व्यवस्थापन समिती त्यांच्या सदस्यांना गुरांच्या चराईसाठी शुल्क आकारु शकेल तसेच जे सदस्य गावाच्या सुक्ष्म योजनेची अंमलबजावणी करणार नाहीत जसे जे सदस्य अनाधिकृतरित्या वृक्षतोड, चराइ आणि अतिक्रमण करतील तसेच वनातील संरक्षणामध्ये सहभागी होणार नाहीत अशा सदस्यांना संयुक्त वन व्यवस्थापन समिती दंड आकारु शकेल किंवा त्या सदस्यांना गौण वन उपजांच्या फायद्यापासून वंचित ठेवण्यात येईल.

७) संयुक्त वन व्यवस्थापन समितीचे बचत खाते

शासनाकडून प्राप्त होणा-या निधीच्या व्यवस्थापनेच्या उद्देशाकरिता राष्ट्रीयीकृत बँक किंवा पोस्ट ऑफीसमध्ये संयुक्त बचत खाते उघडण्यात येईल. सदर खात्याचे संचालन कार्यकारी समितीचे अध्यक्ष व सदस्य-सचिव या दोघांद्वारे संयुक्तपणे करण्यात येईल. सदर बचत खात्यास **"सरकारी खाते"** असे म्हणावे. या खात्यांतर्गत होणाऱ्या निधीच्या विनियोगास उपवनसंरक्षक (प्रादेशिक) यांचे स्तरावर मंजुरी घेतली जाईल.

वार्षिक लेखा परिक्षण :- संयुक्त वन व्यवस्थापन समितीच्या सरकारी खात्याचे राज्य वन विकास यंत्रणा (SFDA) करिता शासनाने प्रचलित केलेली लेखापरिक्षण पध्दतीनुसार कार्यवाही करण्यात येईल.

इतर स्त्रोतांकडून आणि समितीच्या स्वत:च्या उत्पन्नातून प्राप्त होणाऱ्या निधीच्या व्यवस्थापनेच्या उद्देशाकरिता राष्ट्रीयीकृत बँक किंवा पोस्ट ऑफीसमध्ये स्वतंत्ररित्या बचत खाते उघडण्यात येईल. सदर खात्याचे संचालन अध्यक्ष व कोषाध्यक्ष किंवा कार्यकारिणीतील एक सदस्य संयुक्तपणे करतील. सदर बचत खात्यास "संयुक्त वन व्यवस्थापन समिती खाते" असे म्हणावे. सदरहू खात्यातील निधिच्या विनियोगास ग्रामपंचायतीच्या आमसभेअंतर्गत मंजुरी घेतली जाईल.

८) **संयुक्त वन व्यवस्थापन समितीचे कर्तव्य व जबाबदाऱ्या :**

१. वनाचे, वन्यजीवांचे व जैवविविधतेचे संरक्षण व संवर्धन संयुक्तपणे करणे.

२. वन गुन्हयांवर नियंत्रण ठेवण्याकरिता वन अधिकाऱ्यांसोबत सहकार्य करणे.

३. सूक्ष्म योजनेची योग्यरितीने अंमलबजावणी करणे.

४. इतर विभागांशी समन्वय साधून ग्राम विकासाच्या योजना आखणे व राबविणे.

५. संयुक्त वन व्यवस्थापन समितीला वर्ग केलेल्या वनक्षेत्रात निसर्ग पर्यटनाच्या कामाला चालना देणे करिता राज्याच्या निसर्ग पर्यटन धोरणानुसार योजना तयार करुन त्याची अंमलबजावणी करणे. यामध्ये स्थानिक पर्यटन स्थळांचा त्यांचा ऱ्हास न होता विकास करणे, यामधून स्थानिकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करुन देणे व त्या स्थळाचे महत्व सर्वसामान्यांपर्यंत पोहचविणे याची दखल घेतली जाईल.

६. वनक्षेत्रातील प्रेक्षणीय स्थळे तसेच गड, किल्ले, धबधबे, कुंड इ. ठिकाणी भेट देणाऱ्या पर्यटकांकडून उपद्रव शुल्क व प्रवेश शुल्क वसुलीचे अधिकार समितीस राहतील. जेणेकरुन पर्यटन स्थळाची स्वच्छता, पावित्र्य व निसर्ग समतोल साधता येईल.

७. अवैध वृक्षतोड, चराई, वणवा, शिकार अशा प्रकरणी समितीने दंडनिहाय कार्यवाही करणे अभिप्रेत आहे.

वरीलप्रमाणे समितीने त्यांचे कर्तव्य व जबाबदारी पार पाडल्याबद्दल वनपरिक्षेत्र अधिकारी व वनव्यवस्थापन समिती संयुक्तपणे मूल्यांकन करुन दरवर्षी (वित्तीय वर्ष) उपवनसंरक्षक (प्रा.) यांचेकडे अहवाल सादर करेल.

## ९) संयुक्त वन व्यवस्थापन समितीस वनोपजाचे फायदे

### अ) अकाष्ठ वनोपज

सूक्ष्म योजना तयार झाल्यानंतर वनाला कुठल्याही प्रकारची इजा न करता व कार्यआयोजनेच्या तरतुदींचा भंग न करता समितीचे सदस्यांना घरगुती उपयोगासाठी अकाष्ठ वनोपज (तेंदू व आपटा पाने वगळून) समितीनी ठरविलेल्या सवलतीच्या दराने मिळेल. तसेच सभासदांना पुरवठा केल्यानंतर शिल्लक राहिलेल्या या वनोत्पादनाची विक्री संयुक्त वनव्यवस्थापन समिती करेल. यामधून प्राप्त झालेल्या उत्पन्नाची रक्कम संयुक्त वनव्यवस्थापन **समिती खात्यामध्ये** जमा करण्यात येईल. याशिवाय बांबू/गवत सारखे अकाष्ठ वनोपज वनसंवर्धनदृष्ट्या उपलब्ध असल्यास त्याचा कार्य आयोजनेतील तरतुदीनुसार लाभ घेता येईल.

अनुसूचित क्षेत्रामध्ये महाराष्ट्र अनुसूचित क्षेत्रातील गौण उत्पादनाच्या मालकीचे हस्तांतरण व महाराष्ट्र गौण वनोत्पादन (व्यापाराचे विनियमन) (सुधारणा) अधिनियम, १९९७ अन्वये ग्रामसभेला गौण वन उपजाची मालकी हस्तांतरीत करण्यात आली असल्याने संयुक्त वन व्यवस्थापन समिती अकाष्ठ वनोत्पादन गोळा करण्यापूर्वी ग्रामसभेच्या ठरावाद्वारे त्याची परवानगी घेईल. त्याचप्रमाणे महाराष्ट्र अनुसूचित क्षेत्रातील गौण वनोत्पादनाच्या मालकीचे हस्तांतरण महाराष्ट्र गौण उत्पादन (व्यापाराचे विनियम) (सुधारणा) अधिनियम, १९९७ व महाराष्ट्र जनजातीच्या व्यक्तीची आर्थिक स्थिती (सुधारणे) अधिनियम, १९७६ चे अनुपालन करण्यात यावे.

अशाप्रकारे वनाचे व्यवस्थापन करीत असताना क्षमतेपेक्षा जास्त वनापजाचे निष्कासन झाल्यास सदर वनापजाचे पुनरुत्पादन होईपावितो सदरहू अधिकार त्या कालावधीपर्यन्त स्थगित ठेवण्याचे अधिकार स्थानिक वनक्षेत्रपालाचे शिफारशीवरुन उपवनसंरक्षक (प्रा.) यांना राहतील.

संयुक्त वन व्यवस्थापन समिती कोणत्याही वन्यप्राणी अभयारण्य, राष्ट्रीय उद्याने व व्याघ्र प्रकल्प यामध्ये असतील तर त्या समितीचे नामकरण इको डेव्हलपमेंट समिती असे राहील व त्या समितीला देण्यात येणाऱ्या फायद्यामध्ये कोणत्याही वनातील काष्ट, अकाष्ट वन उपजाचे फायदे देण्यात येणार नाहीत. परंतू. इतर संयुक्त वन व्यवस्थापन समितीला जे अधिकार आहेत ते या समितीला देण्यात येतील.

ब) **वनक्षेत्रामधील अंतिम व अंतरिम तोडीचे फायदे**

संयुक्त वनव्यवस्थापन समितीला त्यांना वर्ग केलेल्या क्षेत्रामधून कार्यआयोजनेप्रमाणे मिळालेल्या उत्पादनातील चांगल्या वनामध्ये **२० टक्के** पर्यंत व अपगत / अवनत वनामध्ये **५० टक्केपर्यंत** वाटा खालील नमूद केल्याप्रमाणे मिळू शकेल. समितीने **५ वर्ष** वनाचे संरक्षण व संवर्धनाबाबत नमूद केलेले कर्तव्य व जबाबदा-या पार पाडल्यानंतर समिती असे फायदे मिळण्यास पात्र ठरेल. अपगत व अवनत वनक्षेत्रात बांबू उत्पादनाचे फायदे समिती गठित झाल्यानंतर, **३ वर्ष** बांबूचे संरक्षण व संवर्धन केल्यासच मिळतील. मात्र चांगल्या जंगलामध्ये कार्य आयोजनेनुसार बांबू तोडण्यास उपलब्ध असेल त्या बांबुचे निष्कासन समिती समझोता समयलेख झाल्यापासून पात्र ठरेल. समितीला वर्ग करण्यात आलेल्या वनांमध्ये कर्ययोजनेमध्ये विशद केल्यानुसार बांबूचे शास्त्रोक्त पद्धतीने निष्कासन करण्यात येईल. असे केल्याने सदर वनांपासून बांबूचे उत्पादन समितीला निरंतर पद्धतीने मिळत राहील.

समितीला पात्र ठरविण्याची प्रक्रिया वनाधिकारी, संयुक्त वन व्यवस्थापन समित्यांचे व स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनिधी यांची वन परिक्षेत्र पातळीवरील संयुक्त समिती करेल. उपवनसंरक्षक ही संयुक्त समिती गठित करतील व त्यांच्याकडून प्राप्त झालेला अहवाल मुख्य वनसंरक्षकांना सादर करतील. मात्र ठरविलेल्या त्यांना वर्ग केलेल्या क्षेत्रामधील अंतिम व अंतरिम तोडीचे समितीला सर्वफायदे व उत्पादनातील वाटा स्थापनेच्या पांचव्या वर्षापासूनच मिळेल. वनोपजाच्या लिलावापासून प्राप्त होणाऱ्या रकमेतून विक्रीकर व आयकर इत्यादी वजा जाता अनुज्ञेय रकमेच्या चांगल्या वनात २०% आणि अपगत व अवनत वनात ५०% रक्कम संयुक्त वनव्यवस्थापन समितीच्या खात्यात जमा केली जाईल व उर्वरित ५० टक्के रक्कम समितीच्या सरकारी खात्यात जमा करण्यात येईल. या रकमेचा वापर सुक्ष्म योजनेनुसार वन विकासाकरिता व गाव विकासाकरिता केला जाईल. सर्वसाधारणपणे या रकमेचा विनियोग वनक्षेत्रावर स्थानिकांच्या दैनदिन गरजा भागविण्याकरिता पडणारा ताण कमी करण्यासाठी आखलेल्या उपाययोजनेसाठी केला जाईल.

## क) वनक्षेत्रात असलेली निसर्गरम्य ठिकाणे व गड-किल्ले संयुक्त वन व्यवस्थापन समितीच्या कार्यक्षेत्रात आणणे

संयुक्त वन व्यवस्थापन समितीचे कार्यक्षेत्रातील क्षेत्र निसर्ग पर्यटनाकरिता विकसित करुन, जर पर्यटकांना आकर्षित करता आले तर पर्यटनापासून मिळणारे प्रवेश शुल्क, कॅमेरा शुल्क असे उत्पन्न संयुक्त वनव्यवस्थापन समितीला मिळेल. प्रवेश फी इत्यादी, संयुक्त वन व्यवस्थापन समितीकडून निर्णय होऊन निश्चित केली जाईल. तथापि सरकारी यंत्रणा किंवा सरकारच्या वतीने सदर ठिकाणी काम करणाऱ्या व्यक्तींना अशा क्षेत्रात प्रवेश फी, इत्यादीची सूट राहील. पर्यटन स्थळाचा ऱ्हास होऊ नये याग्नव संयुक्त वन व्यवस्थापन समिती प्रशिक्षित मार्गदर्शकाच्या सेवा उपलब्ध करुन देईल व त्यायोगे या मार्गदर्शक युवकांना रोजगार उपलब्ध होऊ शकेल. हे मार्गदर्शक शुल्क निश्चितीचे अधिकार संयुक्त वन व्यवस्थापन समिती इतर शुल्काप्रमाणे निश्चित करेल. पर्यटकाकडून मिळणारे शुल्क हे समिती खात्यामध्ये भरण्यात येईल.

जी संयुक्त वन व्यवस्थापन समिती किल्ल्याकडे जाणाऱ्या पाऊलवाटेची स्वच्छता व देखभाल करण्याची जबाबदारी घेईल. त्या समितीस राज्याच्या निसर्ग पर्यटन योजनेतून अनुदान देण्यात येईल. वन विभागांच्या अधिकाऱ्यासोबत सदर समिती खालील प्रमाणे कामे करतील.

१. सर्व किल्ल्यावर जाण्याचे पारंपारिक मार्ग खुणांनी दर्शविण्यात येतील.

२. किल्ल्यावर जाण्याचे प्राचीन मार्ग वापरायोग्य/सुस्थितीत ठेवतील.

३. किल्ल्यावर पिण्याचे पाणी / स्वच्छतागृहांची व्यवस्था ठेवतील.

तसेच जुनी विश्रामगृहे असल्यास चालू स्थितीत ठेवणे व पुरातत्व विभागास आवश्यक त्या सुधारणा करण्यास वन संवर्धन कायद्याच्या अधीन राहून परवानगी देणे ही कामे वन विभागामार्फत करण्यात येतील.

ड) **शुल्काचा वापर**

पर्यटकाकडून मिळणारे शुल्क हे पर्यटन स्थळाची साफसफाई, संरक्षण, माहिती फलक लावणे व पर्यटकासाठी गाईड म्हणून नेमणूक करण्याकरीता वापरण्यात येईल.

इ) **पात्र समित्यांना उपलब्ध असणारे फायदे**

सदर धोरण जाहीर होण्यापूर्वी दि.१६.०३.१९९२ व दि. २५.०४.२००३ चे शासन निर्णयानुसार पात्र समित्यांना जे फायदे अनुज्ञेय आहेत ते फायदे सदर पात्र समित्यांना उपलब्ध राहतील. पात्र ठरविण्यासाठी वनपरिक्षेत्र स्तरावर उपवनसंरक्षक यांचे अध्यक्षतेखाली १ सहायक वनसंरक्षक, संबंधित वनपरिक्षेत्र अधिकारी, आणि २ संयुक्त वनव्यवस्थापन समितीचे सभासद यांची समिती गठीत करण्यात येईल. सदर बैठक परिक्षेत्रातच घेणे बंधनकारक राहील. रोपवन व अवनत वनक्षेत्रामधील अंतरिम तोडीचे फायदे प्रत्यक्षात झालेल्या तोडीप्रमाणे संयुक्त वन व्यवस्थापन समितीला देण्यात यावा. वनासंबंधी सर्व कामे संबंधित वनविभागाच्या मंजूर कार्य योजनेप्रमाणेच वन समितीमार्फतच करावी. जिथे जंगल कामगार सहकारी संस्थेचे कार्यक्षेत्र नसेल त्या गावांत कुपांची कामे समितीला द्यावीत. सदर समितीच्या कार्यक्षेत्रात होणाऱ्या उत्पादनावरील ७ टक्के कर उपवनसंरक्षक जिल्हा परिषदेला देतील व हा वाटा जिल्हा परिषद समितीला देतील. CAMPA व १३व्या वित्त आयोगामधून अवनत वनक्षेत्र (Degraded

Forest) वनीकरणाचा कार्यक्रम हा संयुक्त वन व्यवस्थापन समितीमार्फत अंमलबजावणी करण्याचे नियोजन वन विभाग करेल. तसेच शासनाच्या कार्यक्रमाची अंमलबजावणी आणि शासनाने दिलेली कामे करण्यासाठी संयुक्त वन व्यवस्थापन समिती शासनास मनुष्यबळ पुरवेल.

१०) **संयुक्त वनव्यवस्थापन समितीची / सदस्याची मान्यता रद्द करणे**

संयुक्त वनव्यवस्थापन समितीने त्यांचे कर्तव्ये व जबाबदाऱ्या विशेषत: कार्य आयोजनेच्या तरतुदींचे पालन योग्यरितीने हाताळण्यात हयगय केल्यास उपवनसंरक्षक (प्रा.) ही समिती बरखास्त करु शकतील. सदस्याची सदस्यता रद्द करण्याचा निर्णय संयुक्त वनव्यवस्थापन समिती घेईल. हे करताना नैसर्गिक न्यायाच्या तत्वाचे पालन करण्यात येईल.

अपील

समिती / सदस्याची सदस्यता भंग झाल्यानंतर एक महिन्याचे आत समिती / सदस्य मुख्य वनसंरक्षक (प्रा.) यांचेकडे अपील करु शकतील. मुख्य वनसंरक्षक यांचा निर्णय हा अंतिम राहील.

११) **राज्यपातळीवर समिती**

संयुक्त वन व्यवस्थापन कार्यक्रमांच्या अंमलबजावणी करतांना उदभवणारे अनेक प्रश्न सोडविण्यासाठी व संयुक्त वनव्यवस्थापन समित्या सुरळीतपणे काम करतील यांची खात्री करण्यासाठी प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांच्या अध्यक्षतेखाली पुढे नमूद केल्याप्रमाणे राज्यस्तरीय सुकाणू समिती गठीत करण्यात येत आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य | अध्यक्ष |
| २. | प्रधान मुख्य वनसंरक्षक (उत्पादन व व्यवस्थापन) | सदस्य |
| ३. | अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प,नियोजन व विकास) | सदस्य |
| ४. | अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (संरक्षण) | सदस्य |
| ५. | अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अकाष्ठ वनोपज, संनियंत्रण व मुल्यांकन) | सदस्य |
| ६. | अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (तंत्रज्ञान व धोरण) | सदस्य |
| ७. | समितीमधून निवड केलेले ३ महिला प्रतिनिधी पुरुष प्रतिनिधी ७, स्वयंसेवी संस्थेचे २ प्रतिनिधी | सदस्य |
| ८. | मुख्य वनसंरक्षक (संयुक्त वन व्यवस्थापन/नियोजन व विकास) | सदस्य-सचिव |

१२. अंमलबजावणी प्रक्रिया (**IMPLEMENTATION MECHANISM**)

संयुक्त वन समितीमार्फत वनक्षेत्राचा गैरवापर होऊ नये म्हणून त्यांना अधिकार देते वेळी काही महत्वाच्या अटी व शर्ती लावण्यात येतील तसेच योग्यप्रकारे वनांचे व्यवस्थापन केल्यास आकर्षक बक्षिस योजना राबविण्यात येईल.

सदर शासन निर्णय हा ग्रामविकास विभाग, आदिवासी विकास विभाग, वित्त विभाग यांच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

संगणक संकेतांक - 201110101434430001

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

( प्रवीणसिंह परदेशी )
प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन

१) मा. मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव
२) मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन
३) सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव
४) प्रधान मुख्य वनसंरक्षक, (वन बल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर
५) प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), महाराष्ट्र राज्य, नागपूर
६) प्रधान मुख्य वनसंरक्षक (उत्पादन व व्यवस्थापन), महाराष्ट्र राज्य, नागपूर
७) व्यवस्थापकीय संचालक, वनविकास महामंडळ मर्या. कडबी चौक, नागपूर
८) महासंचालक, सामाजिक वनिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे
९) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (सर्व)
१०) सर्व मुख्य वनसंरक्षक /वनसंरक्षक /उपवनसंरक्षक
११) महालेखापाल-१/२ (लेखा व अनुज्ञेयता/ लेखा परीक्षा), महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर
१२) सर्व विभागीय आयुक्त
१३) जिल्हाधिकारी (सर्व)
१४) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
१५) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी.
१६) सर्व मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
१७) प्रकल्प अधिकारी, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा (सर्व)
१८) जिल्हा विकास अधिकारी (सर्व), जिल्हा कृषि अधिकारी / मृद संधारण अधिकारी (सर्व)

१९) जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी (सर्व), जिल्हा आदिवासी कल्याण अधिकारी (सर्व), जिल्हा उद्योग अधिकारी (सर्व)

२०) जिल्हा सार्वजनिक आरोग्य अधिकारी (सर्व)

२१) सर्व कार्यासन अधिकारी, महसूल व वनविभाग (वनकक्ष)

२२) निवडनस्ती, फ-२ कार्यासन, महसूल व वनविभाग, मंत्रालय मुंबई.

| JFMC No | Year | Forest cover grouth since adoption of JFM | Growth of an indicator specives since adoption of JFM | Growth in valuable tree species since adoption of JFM | Natrual regener ation in ha | Does JFM have valuable tree species | Total forest land available in JFM | per capita availability of forest land | 80% or above belonging to one caste (ST,SC, Upper caste) | 3 or more communit ies with at least 15% in each category | No. of land-less house holds | No. of house holds with 0-2 ha | No. of house holds with 2-5 ha | No. of househ olds with 5 ha or more | No. of househ olds with no cattle | No. or % house holds with 1-5 cattle | No. of househ olds with above 5 cattle | No. of active CBOs in JFM | No. of JFMC meeti ngs per year | distan ce to neare st marke t (km) | distan ce to neare st FD | Undermini ng of rights by FD taken place | Formation of JFM done by? | JFM forest used only JFM members | Do JFM members have right to auction NTFPs | infomal rules developed to exclude outsiders free riders from extracting forest product from JFM forest | Can JFMC or employ other sanctions against internal members for illegal felling grazing in ares closed by JFMC or for not provodong volunteers for preventing forest fires | Plantat ion taken in ha | Total Populat ion | SC | ST | OBC | Others | Area closed for grazing in Ha | Grazing incidenc es in area allotted | Total Man days of Shramdan | Total Man days of Shramdan | Benefit from Timber in Rs. | Benefit from Bamboo in Rs. | Awaren ess about JFM GR | Awaren ess about benefit of JFM | Participat ion of members in meetings | Participati on Women members in meetings |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| vihigaon 1 **(shahapur)** | 2007 | Positive | Positive | Positive | 0 | Hirda | 1516.36 | 0.911 | ST | ST | 194 | 65 | 65 | 32 | 234 | 90 | 36 | SHG -1 | 5 | 15 | 2 | No | FD | Yes | No | no | Yes JFM fine agaist illegal felling, illegal grazing in areas closed by JFMC | 50 | 1665 | 44 | 1601 | 0 | 20 | 100 | 120 | 53 | 54 | 0 | 0 | Average | Good | 10 | 4 |
| Khardi (Khashti) 2 | 2007 | Positive | Positive | Positive | 40 | Hirda | 310.742 | 0.890 | ST | SC,OBC, ST | 89 | 0 | 1 | 0 | 80 | 0 | 10 | SHG -1 | 5 | 5 | RFO Khardi | No. | fd | Yes | No | no | Yes like above | 155 | 349 | 0 | 346 | 0 | 3 | 135 | 175 | 184 | 185 | 0 | 0 | Average | good | 9 | 4 |
| Bhagdal 3 | 2003 | Positive | Positive | Positive | 25 | Teak, bamboo, | 451.735 | 0.852 | ST | OBC | 32 | 27 | 23 | 10 | 40 | 45 | 15 | SHG -1 | 12 | 14 | 6 | No | F D | Yes | No | no | yes like above | 50 | 530 | 26 | 185 | 344 | 0 | 451.735 | 0 | 124 | 125 | 0 | 0 | Average | good | 9 | 2 |
| vihigaon (Kochala) 4 | 2007 | Positive | Positive | Positive | 0 | Teak, Bamboo, | 523.4 | 0.814 | ST | 10 | 41 | 25 | 25 | 0 | 41 | 46 | 15 | SHG -1 | 5 | 6 | 0.5 | No | FD | Yes | No | no | yes like above | 50 | 643 | 578 | 12 | 26 | 26 | 523.4 | 450 | 0 | 1 | 42500 | 9375 | Average | good | 15 | 4 |
| Dhasai (Kudshet) 5 | 2003 | Positive | Positive | Positive | 45 | Teak, Ain,Dhavda | 403.35 | 0.670 | ST | 579 | 70 | 36 | 0 | 0 | 36 | 15 | 21 | SHG - 5 | 6 | 13 | 11 | Illicit material seized with the help of JFM were not shared with JFMC | FD | Yes | No | no | yes like above | 30 | 602 | 590 | 12 | 0 | 0 | 75 | 0 | 1606 | 1607 | 50000 | | Average | Good | 8 | 3 |
| | 2010 | everything else same | | | | | | | | 590 | | | 10 | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| Dholkhmb (Babare) 6 | 2010 | Positive | Positive | Positive | 25 | Teak, Ain,Dhavda | 193.972 | 0.239 | ST | Kunbai | 20 | 35 | 50 | 25 | 50 | 562 | 200 | SGH -1 | 12 | 19 | 3 | No | Forest Dept | Yes | No | no | yes like above | 95 | 812 | 4 | 515 | 239 | 0 | 447.82 | 0 | 0 | 1 | 0 | 0 | Good | Good | 11 | 2 |
| Washala (Susarwadi) 7 | 2010 | Positive | Positive | Positive | 20 | Teak, Ain,Dhavda | 362.9 | 0.534 | ST | 0 | 35 | 26 | 10 | 0 | 139 | 62 | 0 | SGH -4 | 12 | 14 | 4 | No | Forest Dept | Yes | No | no | yes like above | 95 | 680 | 9 | 634 | 37 | 418.76 | 142.599 | nil | 0 | 1 | 0 | 0 | Average | good | 8 | 2 |
| **Roha**-Prapatra (8) | 2003 | postive | positive | same | | Yes | 50 | | OBC | O.B.C.& S.T. | 21 | 115 | 15 | 8 | 75 | 71 | 13 | Mahila bachat gut-3 , | 6 | 12 | 1 | No | FD | Yes | No | Yes | Yes | | | | | | | | | | | | | | | | |
| | 2010 | postive | positive | same | 25 | Yes | 50 | 0.060 | O.B.C. | O.B.C.& S.T. | 27 | 119 | 22 | 11 | 72 | 74 | 33 | Mahila bachat gut-3 , | 6 | 12 | 1 | No | FD | Yes | No | Yes | Yes | 25 | 837 | 0 | 135 | 702 | 0 | 50 | 0 | 220 | 221 | 0 | 0 | Very good | Very good | 25 | 5 |
| Mangaon (9) | 2003 | same | same | same | | same | 41.9 | | Upper caste | Nil | 16 | 43 | 28 | 36 | 50 | 49 | 24 | 1 | 10 | 5 | 5 | No | F.D. | Yes | No | Yes | Yes | | | | | | | | | | | | | | | | |
| | 2010 | *positive* | positive | Teak,Ain, bamboo (positive) | 25 | Teak,Ain, bamboo (positive) | 41.9 | 0.062 | Upper caste | Nil | 16 | 58 | 43 | 36 | 50 | 70 | 33 | 5 | 15 | 5 | 5 | No | F.D. | Yes | No | Yes | Yes | 25 | 678 | 10 | 0 | 615 | 0 | 25 | 0 | 100 | 101 | 0 | 0 | Very Good | Very Good | 439 | 265 |
| Mahad (10) | 2003 | positive | positive | Positive | | Teak | 47.29 | | Upper caste | No | 125 | 88 | 37 | Nil | 140 | 85 | 25 | 1 | 10 | 30 | 15 | No | F.D. | Yes | No | Yes | Yes | | | | | | | | | | | | | | | | |
| | 2010 | positive | positive | Positive | 25 | Teak | 47.29 | 0.049 | Upper caste | No | 132 | 117 | 44 | Nil | 165 | 103 | 25 | 3 | 10 | 30 | 15 | No | F.D. | Yes | No | Yes | Yes | 25 | 975 | 170 | No | No | 868 | 47.29 | 0 | 0 | 1 | 0 | 0 | Good | Good | 72 | 21 |
| Murud (11) | 2003 | positive | positive | positive | | Yes | 490 | | Upper caste | Nil | 57 | 25 | 12 | 1 | 50 | 25 | 20 | 1 | 5 | 10 | 7 | No | F.D. | Yes | No | Yes | Yes | | | | | | | | | | | | | | | | |
| | 2010 | positive | positive | positive | 0 | Yes | 490 | 0.734 | Upper caste | Nil | 77 | 26 | 11 | 1 | 60 | 40 | 15 | 2 | 10 | 10 | 7 | No | F.D. | Yes | No | Yes | Yes | 50 | 668 | 0 | 0 | 0 | 668 | 50 | 0 | 20 | 21 | 0 | 0 | Good | Good | 100 | 35 |
| Mhasala (12) | 2003 | positive | positive | positive | | Yes | 78.52 | | 0 | S.C., OBC | 1 | 57 | 20 | 1 | 9 | 65 | 5 | 7 | 7 | 9 | 9 | No | FD | Yes | No | Yes | Yes | | | | | | | | | | | | | | | | |
| | 2010 | positive | positive | positive | 0 | Yes | 78.52 | 0.242 | 0 | S.C., OBC | 1 | 62 | 25 | 1 | 11 | 72 | 6 | 7 | 9 | 9 | 9 | No | FD | Yes | No | Yes | Yes | 25 | 324 | 30 | 0 | 285 | 0 | 78.52 | 0 | 0 | 1 | 0 | 0 | Very good | Very good | 8 | 5 |
| Shriwardhn (13) | 2010 | positive | positive | positive | 25 | Yes | 60.55 | 0.129 | O.B.C. | O.B.C.& N.T | 15 | 107 | 0 | 0 | 20 | 97 | 5 | Mahila Bachat gut-7 , Mahila Mandal-1 = Total | 8 | 16 | 14 | 0 | FD | Yes | No | Yes | Yes | 25 | 469 | 16 | 0 | 453 | 0 | 60.55 | 0 | 40 | 41 | 0 | 0 | good | good | 75 | 48 |
| **Alibaug**--Dhavar (14) | 2003 | Positive | Positive | Positive | 25 | Teak, Bamboo | 119 | | Uper Class | 0 | 22 | 80 | 1 | 0 | 66 | 16 | 4 | womens self help groups-1 | 12 | 3 | 7 | No | FD | Yes | No | No | no | | | | | | | | | | | | | | | | |
| | 2010 | Positive | Positive | Positive | 25 | Teak, Bamboo | 119 | 0.224 | Uper Class | 0 | 22 | 80 | 1 | 0 | 66 | 16 | 4 | womens self help groups-1 | 12 | 3 | 7 | No | FD | Yes | No | No | no | 55 | 532 | 0 | 0 | 0 | 532 | 119 | 0 | 1530 | 1531 | 0 | 0 | very good | very good | 14 | 2 |
| Dontvatwadi (15) | 2010 | positive | positive | positive | 80 | Teak to greater extent. | 120.21 | 0.525 | S.T. | 0 | 36 | 5 | 0 | 0 | 20 | 21 | 0 | 2-Water user association, womens self help | 12 | 13 | 13 | No | Local community | Yes | No | No | No | 25 | 229 | 0 | 229 | 0 | 0 | 120.21 | 0 | 1210 | 1211 | 0 | 0 | Very Good | Very Good | 11 | 3 |

| | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| Lawada (123) | 2010 | Same | Same | Same | | Yes | 221.62 | 0.8269 | | | 29 | 14 | 3 | 6 | 11 | 37 | 4 | 1 | 6 | 22 | 0 | No | FD | Yes | yes-Firewood | No | No | 30 | 268 | 0 | 268 | 0 | 0 | 135 | 0 | #REF! | #REF! | | | 1 | 1 | 1 | 1 |
| Gahatang (124) | 2010 | Positive | Positive | Positive | | Yes | 228.84 | 0.7918 | | | 27 | 8 | 5 | 0 | 8 | 9 | 23 | 0 | 4 | 23 | 0 | No | FD | Yes | No | No | No | 30 | 289 | 129 | 20 | 0 | 2 | 30 | 473 | #REF! | #REF! | 0 | 0 | 1 | 1 | 1 | 0 |
| Hattighat (125) | 2010 | Same | Positive | positive | | Yes | 1362.207 | 2.6046 | | | 87 | 14 | 12 | 0 | 56 | 37 | 21 | 0 | 1 | 10 | 10 | 0 | FD | Yes | No | No | No | 100 | 523 | 0 | 521 | 0 | 2 | 407.923 | 0 | #REF! | #REF! | 0 | 0 | 2 | 1 | 2 | 1 |
| Nayakheda (126) | 2010 | Negetive | Same | Same | | Yes | 631.24 | 1.6227 | | | 27 | 26 | 25 | 0 | 28 | 44 | 6 | 1 | 2 | 6 | 6 | No | FD | Yes | No | No | No | 0 | 389 | 48 | 200 | 8 | 133 | 0 | 0 | #REF! | #REF! | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 0 |
| | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |